।। श्री गजानन प्रसन्न ।।

।। श्री सतपुरुष प्रसन्न ।।

# लोकमार्ग

RNI No. MAHMAR/2013/54958

वर्ष : तिसरे • अंक : ३ रा • दर महिन्याला मुंबई येथून प्रकाशित होणारे मासिक (ऑक्टोबर २०१५) • e-mail : lokmarg@gmail.com • पृष्ठ : ८ • मूल्य : २/- रुपये



वाचक, जाहिरातदार, देणगीदार तसेच हितचिंतकांना दै. लोकमार्ग तर्फे शुभ दीपावली


## जीवनाच्या यथार्थतेसाठी वाचन हवेच...

### - वास्तूशास्त्रज्ञ दिलीप देशमुख

### मुलुंड येथे अटल वाचन कट्ट्याचे उद्घाटन

मुलुंड - विविधांगी वाचन हे जीवनाला यथार्थता बहाल करीत असते. वाचनाच्या व्यासंगामुळेच व्यक्तिमत्व चतुरस्त्र होते. वाचनाची ही आवड जोपासण्यासाठी वाचन कट्ट्यांसारखे उपक्रम निश्चतच उपयुक्त ठरतीलफ्फ, असे उद्‌गार ज्येष्ठ वास्तूशास्त्रज्ञ दिलीप देशमुख यांनी येथे काढले.




• युगादेश मासिकाच्या वतीने मुलुंड येथे अटल वाचन कट्ट्याचे उद्घाटन करताना ते बोलत होते. आज तंत्रज्ञानाचा वापर करून आपली वाचनाची आवड जोपासता येते ती सवय तरुण पिढीमध्ये रुजवण्याकरता या माध्यमाचा निश्चित उपयोग होऊ शकतो, असेही देशमुख यांनी यावेळी सांगितले. माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने राज्यात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचे आवाहन शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी सरकारच्यावतीने केले होते. प्रारंभी या अटल वाचन कट्ट्याच्या उपक्रमाला विनोद तावडे यांनी दिलेला शुभेच्छा संदेश वाचून दाखवण्यात आला. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात राष्ट्रपती झालेल्या डॉ. ए.पी.जे. कलाम या दोन्ही महनीय व्यक्तींमध्ये वाचनाचा व्यासंग हा समान गुण असल्यामुळेच मुंलुंड येथील या उपक्रमाला अटल वाचन कट्टा संबोधले गेले आहे. अशी माहिती युगादेश मासिकाचे संपादक लक्ष्मीकांत जोशी यांनी यावेळी दिली. तर दर महिन्याला चांगल्या पुस्तकातील उताऱ्यांचे वाचन तसेच पुस्तकांची देवाण घेवाण या कट्ट्याच्या माध्यमातून केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अटलबिहारी वाजपेयी यांनी नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयाच्या शतक महोत्सवी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणाचे वाचन केले गेले. त्यामध्ये वाचनाने मनाचा उत्साह आणि आत्मविश्वास वाढीला लागतोफ्फ असा संदेश वाजपेयी यांनी दिला होता. तसेच, वाजपेयींच्या अंधेरा छटेगा, तर डॉ. ए.पी.जे. कलाम यांच्या एका कवितेचे यावेळी वाचन केले गेले. त्या कवितेत कलाम यांनी कोटी जनतेचा

**मी एक प्रतिनिधी।**
**करील प्रज्वलित कोटी**
**आत्म्याच्या ज्योती।**
**अंतरात शिरलेली**
**माझी जीवन दृष्टी।**
**या पेटत्या ज्योती बनतील**
**ताकद त्रैलोक्याची।**
**विकसीत भारताचे**
**स्वप्न पूर्ण करण्यासाठी।।**

अशी भावना व्यक्त केली होती. या वाचन व्यवहाराला उपस्थितांनी दाद दिली. तसेच, आपल्याकडील पुस्तकांच्या देवाण-घेवाणीची तयारीही दर्शविली.

मुंबई । शनिवार २० फेब्रुवारी २०१६

web: http://navakal.org
e-mail- navakal.1923@gmail.com

नवाकाळ

## अवेक इंडिया टू मेक इन इंडियाचे

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

■ मुंबई, प्रतिनिधी



मुंबईत भरलेल्या मेक इन इंडिया सप्ताहाच्या निमित्ताने युगादेश प्रकाशनातर्फे काढण्यात आलेल्या 'अवेक इंडिया टू मेक इन इंडिया' या विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

सदर अंकामध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, अपंगत्वावर मात करीत एव्हरेस्ट सर करणारी पद्मश्री अरुणिमा सिन्हा, कौशल्य विकास मंत्री राजीव प्रताप रुडी, व्यापार आणि वाणिज्य मंत्री निर्मला सितारमण, दूरसंचार मंत्री रवीशंकर प्रसाद, नगर विकास मंत्री व्यंकय्या नायडू, शिक्षण मंत्री विनोद तावडे, मुंबई महापालिकेचे आयुक्त अजोय मेहता, एमआयटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड, ज्येष्ठ वास्तुशास्त्रज्ञ दिलीप देशमुख, व्हिजन इंडिया फाऊंडेशनचे अजय शर्मा, अर्थ शास्त्र विषयाच्या अभ्यासक मंगल गोगटे, जीएसटी विषयी अभ्यास असलेल्या भावना गोखले आदी मान्यवरांबरोबरच पर्यावरण तज्ज्ञ पूनम सिंघवी, विदुला वैद्य यांचेही लेख प्रकाशित केले गेले आहेत.

या अंकाचे मुख्य संपादक ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मीकांत जोशी असून, पूर्ण अंकाचे संपादन दिपा सरना गवली यांनी केले आहे.

पुण्यनगरी

■ सोमवार,२२ फेब्रुवारी २०१६ मुंबई



मुंबईत भरलेल्या मेक इन इंडिया सप्ताहाच्या निमित्ताने युगादेश प्रकाशनतर्फे काढण्यात आलेल्या अवेक इंडिया टू मेक इन इंडिया या विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षण मंत्री विनोद तावडे, डावीकडे अंकाचे मुख्य संपादक लक्ष्मीकांत जोशी आणि व्यवस्थापकीय संचालक दिलीप देशमुख. महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक नोंद करणाऱ्या या विशेष उपक्रमाच्या विविध पैलूंना स्पर्श करणाऱ्या या विशेषांकाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या.

नवाकाळ
मुंबई | रविवार ३ जानेवारी, २०१६

# महानगर विकास परिषदेचा अभिप्राय
# राज्याला वाहन संख्या धोरणाची आवश्यकता

■मुंबई

राज्यात दीड लाख कोटींचे तसेच मुंबईसाठी सागरी रस्ते प्रकल्पाला केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मंजुरी दिल्याने महाराष्ट्राच्या विकासाला नवा आयाम प्राप्त होणार आहे. भविष्यात रस्ते विकासाचा समतोल साधण्याकरिता वाहन संख्या धोरण म्हणजेच व्हेईकल पॉप्युलेशन पॉलिसीचाही विचार करणे क्रमप्राप्त असल्याचा अभिप्राय महाराष्ट्र विकास परिषदेने व्यक्त केला आहे. राज्यातल्या महानगरांचा विकास आणि त्याच्या अनुषंगिक विषयांचा अभ्यास तसेच मागोवा घेण्याचे कार्य महानगर विकास परिषद करीत असते.

राज्याच्या पायाभूत सुविधांचा विचार करताना आधुनिक आणि सुसज्ज रस्त्यांना प्राधान्य द्यावे लागेल. नितीन गडकरी यांनी नव्या वर्षात या नव्या पर्वाला प्रारंभ केल्याबद्दल परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठ वास्तूशास्त्रज्ञ दिलीप देशमुख यांनी आभार मानले. अलिकडेच नॅशनल ट्रान्सपोर्टेशन प्लॅनिंग अँड रिसर्च सेंटरने अँड रिसर्च सेंटरने रस्ते विकासापुढे सगळ्या देशाच्याच विकासाला नवी गती प्राप्त होऊ शकते. अशा प्रकारच्या अभिप्राय व्यक्त केला होता. ११ जानेवारी ते १७ जानेवारी दरम्यान पाळल्या जाणाऱ्या रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त महानगर विकास परिषदेतर्फे व्हेईकल पॉप्युलेशन पॉलिसी संदर्भात संक्षिप्त अहवाल जाहीर केला जाणार आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे प्रकल्पामुळे महाराष्ट्राला झालेले लाभ सर्वांना परिचित असून आता ग्रामीण महाराष्ट्रदेखील विकासयुक्त आणि अपघातमुक्त होण्याला मोठी मदत होईल, असे देशमुख यांनी यावेळी सांगितले.

RNI Regd No. 1814/57 | REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | एक चळवळ | वर्ष-९३, अंक-३००, पाने-१६, किंमत:₹४

web: http://navakal.org | मुंबई, रविवार ३ जानेवारी २०१६ | Email-navakal.1923@gmail.com

# महानगर विकास परिषदेचा अभिप्राय
# राज्याला वाहन संख्या धोरणाची आवश्यकता

■मुंबई

राज्यात दीड लाख कोटींचे तसेच मुंबईसाठी सागरी रस्ते प्रकल्पाला केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मंजुरी दिल्याने महाराष्ट्राच्या विकासाला नवा आयाम प्राप्त होणार आहे. भविष्यात रस्ते विकासाचा समतोल साधण्याकरिता वाहन संख्या धोरण म्हणजेच व्हेईकल पॉप्युलेशन पॉलिसीचाही विचार करणे क्रमप्राप्त असल्याचा अभिप्राय महाराष्ट्र विकास परिषदेने व्यक्त केला आहे. राज्यातल्या महानगरांचा विकास आणि त्याच्या अनुषंगिक विषयांचा अभ्यास तसेच मागोवा घेण्याचे कार्य महानगर विकास परिषद करीत असते.

राज्याच्या पायाभूत सुविधांचा विचार करताना आधुनिक आणि सुसज्ज रस्त्यांना प्राधान्य द्यावे लागेल. नितीन गडकरी यांनी नव्या वर्षात या नव्या पर्वाला प्रारंभ केल्याबद्दल परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठ वास्तूशास्त्रज्ञ दिलीप देशमुख यांनी आभार मानले. अलिकडेच नॅशनल ट्रान्सपोर्टेशन प्लॅनिंग अँड रिसर्च सेंटरने अँड रिसर्च सेंटरने रस्ते विकासापुढे सगळ्या देशाच्याच विकासाला नवी गती प्राप्त होऊ शकते. अशा प्रकारच्या अभिप्राय व्यक्त केला होता. ११ जानेवारी ते १७ जानेवारी दरम्यान पाळल्या जाणाऱ्या रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त महानगर विकास परिषदेतर्फे व्हेईकल पॉप्युलेशन पॉलिसी संदर्भात संक्षिप्त अहवाल जाहीर केला जाणार आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे प्रकल्पामुळे महाराष्ट्राला झालेले लाभ सर्वांना परिचित असून आता ग्रामीण महाराष्ट्रदेखील विकासयुक्त आणि अपघातमुक्त होण्याला मोठी मदत होईल, असे देशमुख यांनी यावेळी सांगितले.

RNI Regd No. 1814/57 | REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | एक चळवळ | वर्ष-९३, अंक-२३४, पाने-१२, किंमत ₹४

web: http://navakal.org | मुंबई, बुधवार २८ ऑक्टोबर, २०१५ | Email-navakal.1923@gmail.com

## मुलुंड येथे 'अटल वाचन कट्ट्या'चे उद्‌घाटन

■ मुंबई, प्रतिनिधी

"विविधांगी वाचन हे जीवनाला यथार्थता बहाल करीत असते. वाचनाच्या व्यासंगामुळेच व्यक्तिमत्व चतुरस्त्र होते. वाचनाची ही आवड जोपासण्यासाठी वाचन कट्ट्यांसारखे उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरतील", असे उद्‌गार ज्येष्ठ वास्तुशास्त्रज्ञ दिलीप देशमुख यांनी येथे काढले.

'युगादेश' मासिकाच्या वतीने मुलुंड येथे 'अटल वाचन कट्ट्या'चे उद्‌घाटन करताना ते बोलत होते. 'आज तंत्रज्ञानाचा वापर करून आपली वाचनाची आवड जोपासता येते ती सवय तरुण पिढीमध्ये रुजवण्याकरिता या माध्यमाचा निश्चित उपयोग होऊ शकतो', असेही देशमुख यांनी यावेळी सांगितले. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने राज्यात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचे आवाहन शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी सरकारच्या वतीने केले होते. प्रारंभी या 'अटल वाचन कट्ट्या'च्या उपक्रमाला विनोद तावडे यांनी दिलेला शुभेच्छा संदेश वाचून दाखवण्यात आला. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात राष्ट्रपती झालेल्या डॉ. ए. पी. जे. कलाम या दोन्ही महनीय व्यक्तींमध्ये वाचनाचा व्यासंग हा समान गुण असल्यामुळेच मुलुंड येथील या उपक्रमाला 'अटल वाचन कट्टा' संबोधले गेले आहे, अशी माहिती 'युगादेश' मासिकाचे संपादक लक्ष्मीकांत जोशी यांनी यावेळी दिली. तर दर महिन्याला चांगल्या पुस्तकातील उताऱ्यांचे वाचन तसेच पुस्तकांची देवाण घेवाण या कट्ट्याच्या माध्यमातून केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अटलबिहारी वाजपेयी यांनी नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयाच्या शतक महोत्सवी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणाचे वाचन केले गेले. त्यामध्ये 'वाचन हे आनंदनिधानासारखे असते. त्यातून मनाचा उत्साह आणि आत्मविश्वास वाढीला लागतो', असा संदेश वाजपेयी यांनी दिला होता. तसेच वाजपेयींच्या 'अंधेरा छटेगा' तर डॉ. ए. पी. जे. कलाम यांच्या एका कवितेचे यावेळी वाचन केले गेले.

# जीवनाच्या यथार्थतेसाठी वाचन हवेच...

**- वास्तूशास्त्रज्ञ दिलीप देशमुख**




## मुलुंड येथे अटल वाचन कट्ट्याचे उद्घाटन

मुलुंड - विविधांगी वाचन हे जीवनाला यथार्थता बहाल करीत असते. वाचनाच्या व्यासंगामुळेच व्यक्तिमत्व चतुरस्त्र होते. वाचनाची ही आवड जोपासण्यासाठी वाचन कट्ट्यांसारखे उपक्रम निश्चतच उपयुक्त ठरतीलफ्फ, असे उद्गार ज्येष्ठ वास्तूशास्त्रज्ञ दिलीप देशमुख यांनी येथे काढले.

युगादेश मासिकाच्या वतीने मुलुंड येथे अटल वाचन कट्ट्याचे उद्घाटन करताना ते बोलत होते. आज तंत्रज्ञानाचा वापर करून आपली वाचनाची आवड जोपासता येते ती सवय तरुण पिढीमध्ये रुजवण्याकरता या माध्यमाचा निश्चित उपयोग होऊ शकतो, असेह्वी देशमुख यांनी यावे[illegible] सांगितले. माजी राष्ट्रपती डॉ. [illegible] अब्दुल कलाम यांच्या [illegible]पत्तीने राज्यात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचे आवाहन शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी सरकारच्यावतीने केले होते. प्रारंभी या अटल वाचन कट्ट्याच्या उपक्रमाला विनोद तावडे यांनी दिलेला शुभेच्छा संदेश वाचून दाखवण्यात आला.

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात राष्ट्रपती झालेल्या डॉ. ए.पी.जे. कलाम या दोन्ही महनीय व्यक्तींमध्ये वाचनाचा व्यासंग हा समान गुण असल्यामुळेच मुलुंड येथील या उपक्रमाला अटल वाचन कट्टा संबोधले गेले आहे. अशी माहिती युगादेश मासिकाचे संपादक लक्ष्मीकांत जोशी यांनी यावेळी दिली. तर दर महिन्याला चांगल्या पुस्तकातील उताऱ्यांचे वाचन तसेच पुस्तकांची देवाण घेवाण या कट्ट्याच्या माध्यमातून केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी अटलबिहारी वाजपेयी यांनी नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयाच्या शतक महोत्सवी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणाचे वाचन केले गेले. त्यामध्ये वाचनाने मनाचा उत्साह आणि आत्मविश्वास वाढीला लागतोफ्फ असा संदेश वाजपेयी यांनी दिला होता. तसेच, वाजपेयींच्या अंधेरा छटेगा, तर डॉ. ए.पी.जे. कलाम यांच्या एका कवितेचे यावेळी वाचन केले गेले. त्या कवितेत कलाम यांनी कोटी जनतेचा

**मी एक प्रतिनिधी।**
**करील प्रज्वलित कोटी**
**आत्म्याच्या ज्योती।**
**अंतरात शिरलेली**
**माझी जीवन दृष्टी।**
**या पेटत्या ज्योती बनतील**
**ताकद त्रैलोक्याची।**
**विकसीत भारताचे**
**स्वप्न पूर्ण करण्यासाठी।।**

अशी भावना व्यक्त केली होती. या वाचन व्यवहाराला उपस्थितांनी दाद दिली. तसेच, आपल्याकडील पुस्तकांच्या देवाण-घेवाणीची तयारीही दर्शविली.